# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड,
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.gov.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


संदर्भ: १. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र.टंलेप्र-१०८१/प्र.क्र.३४४/२०-ब, दि.०६-०५-१९९१
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र.आरटीआर-२०१४/प्र.क्र.३५५/१२, दि.०६-०६-२०१७
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र.आरटीआर-२०१७/प्र.क्र.३६६/१२, दि.११-०६-२०१९
४. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे पत्र क्र.मकृप/आस्था-३/न.क्र.११९/२०४८/२०१७, दि.२२-०८-२०१७
५. विद्यापीठ परिपत्रक क्रमांक २०२२/सं.क्र.४९९/आस्था-३, दिनांक ३०/०६/२०२२
५. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०२३/प्र.क्र.१/कार्यासन-१२, दि.१२-०१-२०२३

**लिपीक-टंकलेखक या पदासाठी मराठी/ इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणेबाबत...**

**क्रमांक२०२३/सं.क्र.५१२/आस्था-३** 1569 **दिनांक ०६-०२-२०२३**

## विद्यापीठ परिपत्रक

07

शासकीय कार्यालयातील लिपीक-टंकलेखक पदाच्या नामनिर्देशन/पदोन्नतीने पदभरतीसाठी "संविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता तसेच मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि." अशी शैक्षणिक अर्हता उपरोक्त संदर्भ क्र.०२ वरील शासन अधिसूचनेनुसार विहीत करण्यात आली आहे.

संदर्भ क्र.०३ वरील अधिसूचनेनुसार उपरोक्त सेवाप्रवेश नियम महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापूर्वी गट-ड मधील पद धारण करणाऱ्या आणि ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. अशी विहीत अर्हता धारण केली आहे, अशा कर्मचाऱ्यांचादेखील हे नियम प्रसिध्द होण्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षापर्यंत पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा अशी सुधारणा नमूद केली आहे.

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या संदर्भ क्र.०४ वरील पत्रान्वये शासन अधिसूचना दि.०६-०६-२०१७ नुसार लिपीक-टंकलेखक पदाच्या शैक्षणिक अर्हतेबाबतच्या प्रस्तावास कृषि परिषदेच्या ९४ व्या बैठकीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत असल्याचे कळूवन, त्यानुसार सदर पदाच्या पदभरती प्रक्रियेसंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी, असे कळविले आहे. उपरोक्त नमूद शासन अधिसूचनेच्या अनुषंगाने व कृषि परिषदेच्या पत्रातील सूचनेनुसार संदर्भ क्र.०५ प्रमाणे विद्यापीठ परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

तसेच आता उपरोक्त संदर्भीय क्र.०६ वरील शासन निर्णयान्वये लिपीक-टंकलेखक या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सदर पदावर नियुक्तीसाठी मराठी किंवा इंग्रजी यापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येत असले तरी, नियुक्तीनंतर प्रत्यक्ष शासकीय कामकाज पार पाडण्याच्या दृष्टीने, पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत.

१. महाराष्ट्र शासनात सर्व कामकाज मराठी भाषेतून करण्यात येत असल्याने, शासन अधिसूचना दि.०६ मे,१९९१ नुसार केवळ इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवाराची लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती झाल्यानंतर, त्याने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहीत प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे आहे, अन्यथा त्याची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात यावी.

२. शासकीय कामकाज मराठी भाषेतून होत असले तरीही काही कार्यालयामधील कामकाज इंग्रजी भाषेतून पार पाडावे लागते. यास्तव, केवळ मराठी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवाराची लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती झाल्यानंतर, त्याने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहीत प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे राहील, अन्यथा त्याची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात येईल.

तरी लिपीक-टंकलेखक पदावर नामनिर्देशनाने/ पदोन्नतीने निवड झालेल्या उमेदवारांकडे मराठी/इंग्रजी यापैकी कोणते प्रमाणपत्र आहे ही बाब तपासून, वरील १ किंवा २ यापैकी जे प्रमाणपत्र नसेल त्यासंदर्भात सदर शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही संबंधित कार्यालय प्रमुखानी तात्काळ करण्याची दक्षता घ्यावी.

**मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने,**

**डॉ. धिरजकुमार रा. कदम**
**कुलसचिव**

**प्रतिलिपी:** संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण/सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण)/विद्यापीठ अभियंता/नियंत्रक, वनामकृवि, परभणी *यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या अधिनिस्त कार्यालयातील लिपीकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्दशनास आणून द्यावे व आवश्यकतेनुसार योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी.*

***प्रत:***

१. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे-४११ ००७.
२. मा. कुलगुरू महोदय यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.
३. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी *यांना देऊन कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक* ***लिपीक-टंकलेखक या पदासाठी मराठी/ इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणेबाबत...*** *या शिर्षकाखाली विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.*

८१५०८